# शिक्षकेतर महामंडळ बैठक दि.०५/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षकेतर कर्मचारी नाईट ड्युटी (रात्रपाळी) रद्द करणेबाबत. | यापूर्वीच्या बैठकीमध्ये चर्चा झालेनुसार सांगली जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांनी परिपत्रक निर्गमित केले नाही. याविषयीचे परिपत्रक सांगली जिल्ह्याप्रमाणे अन्य जिल्ह्यांनी परिपत्रक काढावे. यापुढे हा विषय संघटनेकडून मांडला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| २. | विभागीय व जिल्हास्तरावरील त्रैमासिक सभांबाबत. | सहविचार सभा वेळेत घेण्यात येतील. तथापि, वरिष्ठ कार्यालयाच्या बैठका, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणे व अन्य अपरिहार्य कारणांमुळे ऐनवेळी नियोजनात बदल करावा लागतो. विभागीय व जिल्हा स्तरावरील बैठकांबाबत शिक्षणाधिकारी यांनी संघटनेला वेळेत अवगत करावे. तसेच विभागीय बैठकीचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ३. | शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना फंडाच्या स्लिपा वेळेत मिळाव्यात. | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करून मुदतीत भ.नि.नि. स्लिपांचे वितरण शाळांना करणे आवश्यक आहे. तसेच ना-परतावा प्रकरणे विहित कालमर्यादेत निर्गत करावीत. विविध शैक्षणिक संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात असल्याने शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यक त्या सूचना देवून कामकाज पूर्ण करावे. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व भ.नि.नि. स्लिपांचे वितरण माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होईल, याची सर्व जिल्ह्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक संघटनांकडून पुढील बैठकीवेळी हा प्रश्न उपस्थित होणार नाही, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | माहे डिसेंबर, २०१६ अखेर |
| ४. | शिक्षकेतर एकाकी पदाच्या भरतीची कार्यवाहीबाबत. | याबाबत वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आला असून हा विषय राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात येईल. | --- | --- |
| ५. | कालबद्ध व वरिष्ठ वेतनश्रेणी मान्यता लेखाधिकारी यांचेमार्फत देण्यात यावी व शिक्षणाधिकारी मान्यता आवश्यकता नसलेबाबत. | याबाबत वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आला असून संचालनालयाच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही करण्यात घेण्यात येईल. | --- | --- |
| ६. | ऑफलाईन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन मिळणेबाबत. | ऑफलाईन वेतन माहे डिसेंबर, २०१६ अखेर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच ऑफलाईन वेतन ऑनलाईन स्वरूपात करणेबाबत शासनाच्या सूचना आहेत. | --- | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडील विविध प्रस्ताव सादर करणेबाबतची चेकलिस्ट मिळणेबाबत. | वैद्यकीय प्रस्तावांसाठी ४६ मुद्द्यांची चेकलिस्ट आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. विविध प्रस्तावांच्या चेकलिस्ट संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | --- |
| ८. | अनुकंपा भरतीबाबत. | धोरणात्मक प्रश्न. राज्यस्तरीय बैठकीत हा प्रश्न घेण्यात येईल. | शासन स्तरावर | --- |
| | शिक्षकेतर कर्मचारी पदोन्नती प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. | शासन निर्णय दि.१२ फेब्रुवारी, २०१५ व सुधारित आकृतीबंधानुसार पद मान्य ठरत असल्यास हमीपत्र घेवून पदोन्नती देण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ९. | इ.१० वीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची परीक्षा फी वाढीव दराने मिळणेबाबत. | धोरणात्मक प्रश्न. | --- | --- |
| १०. | पदोन्नतीची रिक्त पदे असलेल्या जागी पदोन्नतीने मान्यता मिळणेबाबत. | सुधारित आकृतीबंधानुसार पद मान्य ठरत असल्यास हमीपत्र घेवून पदोन्नती देण्यात यावी. तथापि, खालील पद रिक्त ठरविले जाईल. खालील रिक्त पद देखील सुधारित आकृतीबंधानुसार व अतिरिक्त समावेशनानंतर मान्य / अमान्य ठरविले जाईल. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ११. | रजा मुदतीत लिपीक भरण्यास मान्यता. | शिक्षकेतर पदांबाबत प्रचलित नियमांत तरतुद नाही. | --- | --- |
| १२. | वैयक्तिक प्रकरणे (श्री.मोरे, न्यू इंग्लिश स्कूल, क।। संगमेश्वर व.लिपीक वेतनश्रेणी) | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार वैयक्तिक प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. श्री.मोरे यांचे प्रकरणी या कार्यालयात सुनावणीचे आयोजन करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक स्तरावर | तात्काळ |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**